**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क**

**प्रेस नोट**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका आयोजित स्वच्छ वॉर्ड व स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धा 2025 बक्षीस वितरण सोहळा संपन्न**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने **स्वच्छ सर्वेक्षण 2025** व **माझे शहर माझी जबाबदारी** या उपक्रमांतर्गत **स्वच्छ वॉर्ड व स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धा 2025** आयोजित करण्यात केली होती. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ शर्मा (भा.प्र.से) यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. 4 डिसेंबर 2025 रोजी भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह येथे स्वच्छता रांकिंग स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या आनंदात पार पडला. या स्पर्धेत मिरा भाईंदर शहरातील 88 शाळा/महाविद्यालय, 75 हॉटेल्स, 639 रहिवासी सोसायटी, 47 हॉस्पिटल, 14 शासकीय कार्यालय आणि 6 वॉर्ड यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला होता अतिशय चुरस असलेल्या या स्पर्धेत जिंकण्यासाठी प्रत्येकाने मनापासून मेहनत घेतली होती. **स्वच्छ वॉर्ड व स्वच्छता रँकिंग स्पर्धा 2025** या स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धकांची नावे पुढील प्रमाणे

**स्वच्छ वॉर्ड विभाग :-** 1) प्रभाग समिती 5, 2) प्रभाग समिती 1, 3) प्रभाग समिती 6, **स्वच्छ शाळा / महाविद्यालय विभाग :-1)** एन एल. दालमिया हायस्कूल 2) प्रवीण पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी 3) मनपा शाळा क्रमांक 22 मूर्धा, मराठी 4) एन. एच. स्कूल, **स्वच्छ सोसायटी विभाग :-** 1)नव यूवान सोसायटी 2) एम आय सी ल आराध्या हायपार्क सोसायटी 3) जे. के. आयरिस सोसायटी **स्वच्छ हॉस्पिटल विभाग** 1) भक्तीवेदांत हॉस्पिटल 2) वोक्हार्ट हॉस्पिटल3) गुरुकृपा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल. **स्वच्छ हॉटेल विभाग**:- 1) जी. सी. सी. हॉटेल, 2)साई पॅलेस हॉटेल, 3) सेव्हन इलेव्हन क्लब अँड हॉटेल, **स्वच्छ शासकीय कार्यालय**:- 1) स्वर्गीय कल्पना चावला अग्निशमन केंद्र, 2) मिरा भाईंदर वसई विरार क्राइम ब्रांच, 3)भाईंदर पश्चिम पोलिस स्टेशन.

या बक्षीस वितरण सोहळयाच्या वेळी मा. आयुक्त यांनी उपस्थित सगळयांना संबोधित केले की स्वच्छता ठेवणं फार महत्त्वाचं आहे आपली संस्कृती आपली परंपरा जशी आपण जतन करतो तसेच स्वच्छतेचे

जतन केलं पाहिजे. रोजच्या जीवनात स्वच्छतेला प्राधान्य देऊन घरासोबत आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवला तर आपला शहर देशात जसा स्वच्छते बाबतीत क्रमांक एकवर आहे तसेच नावलौकिक या नंतर कायम मिळेल. यासाठी प्रत्येकाने स्वच्छतेसाठी योगदान देणं, प्रत्येकाने स्वच्छता ठेवून सुंदरतेची नियमितपणा जोपासणे हे गरजेचे आहे. **स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता** जरा प्रत्येकाने जपले तर मिरा भाईंदर शहराच्या स्वच्छतेत आणि सुंदरतेत नक्कीच वाढ होईल असेही त्यांनी नमूद केले तसेच त्यांनी जे स्पर्धक जिंकले त्यांचा अभिनंदन केले,ज्यांना या स्पर्धेत बक्षीस मिळाल नाही त्यांनी नाराज न होता पुन्हा नव्या उमेदीने नव्या उत्साहात कामाला लागून पुढच्या वर्षी क्रमांक 1 होण्यासाठी प्रयत्न करावा यासाठी शुभेच्छा दिल्या.

**स्वच्छ वॉर्ड व स्वच्छता रँकिंग स्पर्धा 2025** या स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना सन्मानपत्र व धनादेश देण्यात आला. बक्षीस वितरण सोहळयात नंतर एन. एच. स्कूल,एन.एल. दालमिया हायस्कूल, महानगरपालिका प्राथमिक शाळा क्रमांक 24 मोर्वा आणि मुर्दा मराठी शाळा क्रमांक 22 या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वच्छता विषयक आणि प्लास्टिक बंदी विषयक पटनाट्य सादर केली. अतिशय आनंदात हा बक्षीस वितरण सोहळा संपन्न झाला असून या वितरण सोहळ्याला अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त प्रणाली घुगे, माहिती व जनसंपर्क अधिकारी राज घरात, सहाय्यक आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग) योगेश गुनिजन, सहाय्यक आयुक्त प्रियांका भोसले तसेच इतर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते सर्व विजेते स्पर्धक आणि त्यांना प्रोत्साहित करणारे नागरिक, शाळा महाविद्यालय मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.